# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,सातारा

'विधी सेवा सदन' ५१५, सदर बझार,जिल्हा न्यायालय इमारतीच्या पाठीमागे,सातारा ४१५००१

## निविदा सुचना

### (लेखापरिक्षक नेमणूकीबाबत)

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा (दुरध्वनी क्र.०२१६२-२९८७८४/८५९१९०३६११) या कार्यालयाचे दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०३/२०२६ या काळातील आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण करणेचे आहे.

**मान्यताप्राप्त व CAG Empanelment असणा-या सनदी लेखापाल यांनी आपल्या निविदा वरील पत्यावर दि.०९/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर कराव्यात. सदर वेळेनंतर दाखल झालेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.**

लेखापरिक्षक संस्था/कंपनी/प्रो.प्रा. यांचे नाव :-
नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता:-
सनद नोंदणी क्रमांक व अनुभव:-
लेखापरिक्षण फी **(सर्व करांसह) :-**

सदर निविदा मंजूर झालेल्या लेखापरिक्षक/कंपनी/प्रो.प्रा. यांना सदरचे काम एक महिन्याच्या आत पुर्ण करावे लागेल. तसेच निविदा मंजूर झालेनंतर सनदी लेखापाल यांचे नेमणूकी नंतर एक महिन्याचे आत लेखापरिक्षण पुर्ण करत असलेबाबत बंधपत्र सादर करावे लागेल.

सर्व करासहीत किती लेखापरिक्षण फी आकारणी केली जाईल याबाबत सविस्तर उल्लेख करुन इच्छुक सनदी लेखापाल यांनी आपल्या निविदा सिलबंद करुन लिफाफ्यावर 'लेखापरिक्षक नेमणूकीबाबत निविदा' असा स्पष्ट उल्लेख करुन मा.सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,सातारा यांचे नावे निविदा सादर करणेत याव्यात. सिलबंद लखोटयावर फर्मचे पूर्ण नाव, पत्ता दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. निविदा स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार राखून ठेवणेत आलेला आहे.

दि. २९/०४/२०२६

आदेशावरुन

ठिकाण :- सातारा

अधिक्षक
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा

१.मा.जिल्हा न्यायालय, सातारा यांचे नोटीस बोर्ड
२.मा.जिल्हा न्यायालय, सातारा यांचे संकेतस्थळावर
३.मा.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,सातारा यांचे नोटीस बोर्ड
४.मा.सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा यांचे नोटीस बोर्ड
५.मा.मुख्यन्यायदंडाधिकारी, सातारा यांचे नोटीस बोर्ड
६.मा. जिल्हा सरकारी वकील, सातारा यांचे नोटीस बोर्ड
७.मा. जिल्हा वकील संघ,सातारा यांचे नोटीस बोर्ड